MHAH190016272022

रे मु नं ४३०/२०२२ मध्ये नि. ५ वर आदेश
( ओम जालींदर मोटकर वि. जालींदर विठ्ठल मोटकर व इतर )

१. प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता १९०८ चे आदेश ३९ नियम १ व २ अनुसार प्रतिवादी विरुध्द तात्पुरता मनाई हुकूम मिळण्यासाठी दाखल केला आहे.

वादीची केस थोडक्यात खालीलप्रमाणे -

२. दावा मिळकत गट क्र. २६७ ही मौजे घोटण, ता. शेवगाव येथील आहे. दावा मिळकत प्रतिवादी क्र २ च्या उत्पन्नातून कुटुंबव्यवस्था म्हणून प्रतिवादी क्र १ चे नावावर खरेदी घेतलेली आहे. दावा मिळकतीची खरेदीची संपूर्ण रक्कम प्रतिवादी क्र २ यांनी लक्ष्मण टाकळकर यांना दिलेली आहे. वादी क्र १ व २ अज्ञान असून त्यांचा दावा मिळकतीमध्ये अविभाज्य हिस्सा आहे. प्रतिवादी क्र १ वादी क्र १ व २ चे वडिल असून त्यांना दारुचे व्यसन आहे. प्रतिवादी क्र १ स्वच्छंदी व मनमानी जीवन जगत आहे. तसेच कुटूंबातील इतर व्यक्तींशी त्याचे वागणे बेताल आहे. प्रतिवादी क्र १ दावा मिळकतीचा इतर लोकांसोबत सौदा करीत आहे. दावा मिळकत पैठण बारामती राज्य मार्गालगत असून त्याची बाजार मूल्य मोठया प्रमाणात आहे. प्रतिवादी क्र १ च्या दारुच्या व्यसनाचा गैरफायदा घेउन विघ्नसंतोषी लोक दावा मिळकत कवडीमोल भावाने घेण्याच्या तयारीत आहेत.

३. वादी क्र १ व २ यांचे शिक्षण चालू आहे. वादींची आई सावित्रा हिने सप्टेंबर २०२२ मध्ये प्रतिवादी क्र १ यास दावा मिळकत विक्री करु नये अशी विनंती केली परंतु प्रतिवादी क्र १ यांनी आई इंदूबाई यांना शिवीगाळ करुन पत्नी सावित्रा हिला मारहाण केली व मिळकतीचे सौदे सुरु केले. प्रतिवादी क्र १ याची पत्नी सावित्रा पतीच्या दहशतीमुळे घाबरुन दावा दाखल करण्यास हजर राहू शकत नाही. दावा मिळकत विक्री झाल्यास वादींना त्यांचे कायदेशीर हिश्यापासून वंचित रहावे लागेल. वादींचे अ.पा.क. यांनी दि.०७/१०/२०२२ रोजी मा. दुय्यम निबंधक शेवगाव यांच्याकडे हस्तांतर स्थगीती करण्याबाबत अर्ज दिला परंतु सदर कार्यालयाने न्यायालयाचा मनाई आदेश असल्याशिवाय हस्तांतर स्थगीत करता येणार नाही असे सांगितले. वादींचे भविष्याचा विचार करुन प्रतिवादी क्र १ ची आई इंदूबाई अज्ञान वादींची आई अ.पा.क झालेली आहे. प्रतिवादी क्र १ याने

सात बारा उता-यावर असलेल्या नावाचा गैरफायदा घेउन दावा मिळकत विक्री किंवा हस्तांतर करु नये म्हणून सदरचा दावा व मनाई अर्ज दाखल करुन तूर्तातूर्त मनाई हुकूम मागितलेले आहे.

४. प्रतिवादी क्र.२ याला दाव्याचे समन्स बजावल्याचा रिपोर्ट बेलिफ ने न्यायालयात नि.क्र.१० वर सादर केला आहे. आणि प्रतिवादी क्र १ यांना काढलेले दावा समन्स एकत्र कुटूंबाचे सदस्य म्हणून प्रतिवादी क्र २ यांनी प्रतिवादी क्र १ चे वडिल या नात्याने प्रतिवादी क्र १ चे समन्स स्वीकारले असून प्रतिवादी क्र १ यांना न्यायालयात तारखेस हजर ठेवतील असा रिपोर्ट बेलिफने नि.क्र ९ वर सादर केला आहे. त्यानंतर प्रतिवादी क्र २ वकिलामार्फत हजर झाले परंतु त्यांनी सदर दाव्याला कैफियत आणि नि.क्र ५ च्या अर्जावर म्हणणे दिलेले नाही. प्रतिवादी क्र १ आजपावेतो सदर दाव्यात हजर झालेले नाहीत. त्यामुळे नि.क्र ५ चा अर्ज प्रतिवादी क्र १ व २ यांच्या म्हणण्याशिवाय ऐकण्यात आला.

५. वादी व प्रतिवादी यांचा युक्तिवाद ऐकल्यानंतर खालील मुद्दे माझे विचारार्थ उपस्थित होतात, ते मुद्दे व त्यावरील माझी उत्तरे त्याखाली नमूद केलेल्या कारणांसाठी पुढीलप्रमाणे देण्यात येत आहेत.

| अ. क्र. | मुद्दे | उत्तरे |
|---|---|---|
| १ | वादी मागतो तशी तूर्तातूर्त मनाई मिळण्यास सकृतदर्शनी स्थिती असल्याचे तो सिध्द करतो का ? | ..होय |
| २ | वादी मागतो तशी तूर्तातूर्त मनाई मिळण्यास समतोलत्व त्यांच्या बाजूने असल्याचे तो शाबित करतो का ? | ..होय |
| ३ | वादी मागतो तशी तूर्तातूर्त मनाई नाकारल्यास त्यांचे पैशाने भरुन न येणारे नुकसान होईल असे वादी शाबित करतो का ? | ..होय |
| ४ | काय आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

६. वादीने त्याच्या म्हणण्यापुष्टयर्थ नि.३ सोबत खालील कागदपत्रे दाखल केली

१. मौजे घोटण येथील गट नं २६७ चा सात बारा उतारा,

२. फेरफार क्र. ५३९१ चा उतारा

३. वादीने दुय्यम निबंधक सो. शेवगाव यांचेकडे दिलेला तक्रारी अर्ज

४. वादीच्या आधारकार्डची व्हेरिफाईड झेरॉक्स प्रत

५. वादी क्र १ व २ यांचे आधार कार्डची झेरॉक्स प्रत

<u>मुद्दा क्र. १ ते ३ बाबत</u> -

७. वादीतर्फे युक्तिवाद ऐकला. वादीतर्फे विधीज्ञ श्री जी पी देशमुख यांनी असा युक्तीवाद केला की, वादीने सदरचा दावा प्रतिवादी क्र. १ व २ विरुध्द निरंतर ताकिद मनाई हुकूमासाठी या न्यायालयात दाखल केलेला आहे. दावा मिळकत गट क्र २६७ प्रतिवादी क्र १ च्या नावावर आहे. परंतु सदरची दावा मिळकत खरेदी करण्यासाठी प्रतिवादी क्र २ यांच्या उत्पन्नातून कुटूंब व्यवस्था म्हणून प्रतिवादी क्र १ च्या नावावर खरेदीने सदरची दावा मिळकत घेतलेली आहे. वादी क्र १ व २ हे प्रतिवादी क्र १ ची मूले आहेत. वादी क्र १ व २ अज्ञान असून दावा मिळकत प्रतिवादी व वादी यांची एकत्र कुटूंबाची मिळकत आहे आणि सदर मिळकतीमध्ये वादींचा अविभाज्य हिस्सा आहे. दावा मिळकत हस्तांतर होउ नये म्हणून वादींचे अ.पा.क यांनी दि. ७/१०/२०२२ रोजी दुय्यम निबंधक शेवगाव यांच्याकडे तक्रारी अर्ज केला हाता परंतु न्यायालयाच्या मनाई आदेशाशिवाय हस्तांतर स्थीगीत करता येणार नाही असे सांगून वादींचे अ.पा.क यांचा अर्ज निकाली काढण्यात आला. सदरच्या अर्जापुढे असे नमूद केले आहे की ति-हाईत व्यक्तीने कोणत्याही प्रकारे दावा मिळकती संदर्भात हक्क हितसंबंध निर्माण करु नये आणि दावा मिळकत हस्तांतर होउ नये म्हणून वादीने सदरचा अर्ज व दावा दाखल केला आहे. प्रथमदर्शनी केस वादीच्या बाजूने आहे. तसेच न्यायाचा समतोल वादीच्या बाजूने आहे. प्रस्तुतचा अर्ज नामंजूर झाल्यास वादीला जागा शिल्लक राहणार नाही आणि वादीचे अपरिमित नुकसान होईल. म्हणून सदरचा अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

८. वरील मुद्दयांची पुनरावृत्ती टाळण्याकरता ते एकत्रीत चर्चिले जात आहेत.

९. कायद्याची स्थापीत स्थिती अशी आहे की तात्पुरत्या मनाई हुकूमाकरता प्रथमदर्शनी दावा व न्यायाचा समतोल त्यांच्या बाजूने असून मनाई हुकूम न मिळाल्यास त्यांचे अपरिमीत असे नुकसान होणार आहे, या तीनही बाबी वादी यांनी सिध्द करणे गरजेचे आहे.

१०. वादी यांनी दाखल केलेल्या कागदोपत्री पुराव्याचे अवलोकन केले असता वादीने अभिलेखावर दावा मिळकत गट क्र २६५ चा सात बारा उतारा आणि फेरफार क्र ५३९१ चा उतारा दाखल केलेला आहे.

११. वादीने प्रस्तुतच्या अर्जात प्रतिवादी क्र १ यांनी दावा मिळकतीचे कोणत्याही प्रकारे हस्तांतर करु नये तसेच ति-हाईत इसमाचे हितसंबंध निर्माण करु नये म्हणून प्रतिवादी क्र १ यांच्या विरुध्द तूर्तातूर्त मनाई हुकूम मागितलेला आहे. प्रस्तुतच्या अर्जात वादीने प्रतिवादी क्र १

व्यसनाच्या आहारी जाउन दावा मिळकत विक्री करु शकतो अशा प्रकारची कथने केलेली आहेत. दावा मिळकत वादीची वडिलोपार्जित अविभाज्य मिळकत असल्याचे कथन वादीने केलेले आहे. प्रतिवादी क्र १ व २ यांना पुरेशी संधी देउनही प्रतिवादी क्र १ व २ दाव्यात हजर झाले नाही तसेच प्रस्तुतच्या अर्जाला त्यांचे म्हणणे दिले नाही. दावा मिळकत वादीची वडिलोपार्जित मिळकत आहे किंवा कसे आणि प्रतिवादी क्र २ यांनी स्वतःच्या उत्पन्नातून कुटूंब व्यवस्था म्हणून प्रतिवादी क्र १ च्या नावे खरेदी घेतली किंवा कसे हे मुद्दे दावा चालवून वादीला शाबित करणे गरजेचे आहे. परंतु दाव्याच्या हया टप्प्यावर प्रस्तुतचा अर्ज नामंजूर झाल्यास कोणाचे अपरिमित नुकसान होईल ही बाब पाहणे या अर्जासाठी महत्वाची आहे. प्रतिवादी क्र १ व २ यांनी वादीने केलेली कथने खोडून काढण्यासाठी दाव्यात हजर होउन त्यांचे म्हणणे दिलेले नाही. त्यामुळे वादीने प्रस्तुतच्या अर्जात केलेली कथने आव्हानित झालेली नाहीत. मी याठिकाणी दलपत कुमार व इतर वि. प्रल्हाद सिंग व इतर (ए.आय.आर १९९३ एससी २७६) या मा. सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायनिर्णयावर विसंबून राहते.

*Hon'ble Supreme Court observed that it is settled law that grant of injunction is a discretionary relief. The exercise thereof is subject to the court satisfying that*

- *1. there is serious disputed question to be tried in the suit and that an act, on the facts before the court, there is probability of his being entitled to the relief asked for by the plaintiff/defendant;*

- *2. the courts interference is necessary to protect the party from species of injury. In other words, irreparable injury or damage would ensue before the legal right would be established at the trial; and*

- *3. the comparative hardship or mischief of inconvenience which is likely to occur from withholding the injunction will be greater than that would be likely to arise from granting it.*

१२. उपरोक्त सर्व परिस्थीती विचारात घेतली असता आणि वादीने दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता, प्रतिवादी क्र १ यांनी दाव्याचा निकाल लागेपावेतो दावा मिळकत हस्तांतरित करु नये असा मनाई हुकूम दिल्यास प्रतिवादीला काही नुकसान होणार नाही, परंतु सदरचा मनाई हुकूम अर्ज रद्द केल्यास वादीला मात्र नुकसान होईल. त्यामुळे वादीस दावा मिळकतीसाठी प्रथमदर्शनी केस आहे असे म्हणता येते व त्या मिळकतीबाबत न्यायाचा समतोलही वादीचे बाजूने आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र १ हयांनी दावा मिळकत हस्तंतारित केल्यास वादीचे कधीही न भरुन येणार नुकसान होईल व तसे वादीने सकृतदर्शनी सिध्द केले आहे. म्हणून सदरचा

अर्ज मी होकारार्थी निष्कर्ष नोंदवून मंजूर करत आहे. त्यामुळे मी मुद्दा क्र १ ते ३ चे निष्कर्ष होकारार्थी देउन मुद्दा क्र ४ बाबत खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. वादीचा तूर्तातूर्त मनाईचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. या दाव्याचा अंतिम निकाल होईपर्यंत प्रतिवादी यांनी दाव्याचा निकाल लागेपावेतो प्रतिवादी क्र १ यांनी दावा मिळकतीचे कोणत्याही प्रकारे हस्तांतर करु नये तसेच ति-हाईत व्यक्तींचा हितसंबंध निर्माण करु नये म्हणून प्रतिवादी क्र १ विरुध्द तूर्तातूर्त मनाई देण्यात येते.

३. खर्चाची बाब अंतिम न्यायनिर्णयाच्या वेळेस विचारात घेण्यात येईल.

SANJANA UDAY JAGUSTE Digitally signed by SANJANA UDAY JAGUSTE Date: 2023.04.06 12:10:42 +0530

दि. ०५/०४/२०२३
शेवगाव

(एस. यू. जागुष्टे)
दिवाणी न्यायाधीश क.स्तर
शेवगाव